# ठक्कर यांची नियुक्ती

नाशिक : येथील ठक्कर्स डेव्हलपर्स अध्यक्ष जितेंद्र ठक्कर यांना भारत सरकारच्या अर्थ मंत्रालया अंतर्गत कार्य करणाऱ्या



राष्ट्रीय कौशल्य विकास महामंडळाच्या संचालक मंडळावर २०१५-२०१७ या आर्थिक वर्षासाठी संचालक म्हणून नुकतेच नियुक्त करण्यात आले आहे. तसेच कन्ट्रक्शन स्किल डेव्हलपमेंट कौन्सिल ऑफ इंडिया या संस्थेत कार्य करण्यासाठी देशभरातून १५ संचालक निवडण्यात आले असून ठक्कर यांना त्यातील एक संचालक म्हणनही नियुक्ती देण्यात आली आहे.दोन्ही नेमणुकांसाठी ठक्कर यांचे नामांकन करण्याचा निर्णय 'क्रेडाई' या स्थावर मालमत्ता विकासकांच्या अखिल भारतीय संघटनेच्या पदाधिकाऱ्यांच्या नवी दिल्ली येथे पदग्रहण कार्यक्रम प्रसंगी जाहिर करण्यात आला.

(वा.प्र.)